# देगलूर महाविद्यालयातील ४ खेळाडूंची निवड



**देगलूर / प्रतिनिधी**

अण्णा विद्यापीठ,चेन्नई येथे होणाऱ्या आंतर विद्यापीठीय बॉल बॅडमिंटन (महिला)स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या संघात देगलूर महाविद्यालय, देगलूरचे चार खेळाडू इंगोले सृष्टी, गुजलवाड मयुरी,इंगोले वैष्णवी व सूर्यवंशी पल्लवी यांची निवड झाली आहे. या विद्यापीठीय संघाचे प्रशिक्षण शिबिर दि.११ ते दि.१८ मार्च दरम्यान महाविद्यालयाच्या मैदानात संपन्न झाले. या महिला संघास शुभेच्छा देतेवेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर , कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे ,व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. सूर्यकांत जोगदंड , क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी, विद्यापीठीय संघाचे प्रशिक्षक म्हणून डॉ दिलीप भडके तर सहाय्यक प्रशिक्षक कांबळे मधुकर हे उपस्थित होते.खेळाडूंचे महाविद्यालयीन प्रशिक्षक म्हणून डॉ. निरजकुमार उपलंचवार व प्रा.दीपक वावधाने,प्रा. सीताराम हाके यांचे मार्गदर्शन लाभले.

या खेळाडूंचे अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार ,उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार,कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उनग्रतवार , जनार्दन चिद्रावार ,गंगाधर जोशी, रवींद्र द्याडे. देवेन्द्र मोतेवार , चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ ,उपप्राचार्य डॉ अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे , पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशींसह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी कौतुक केले आहे.

Scanned with OKEN Scanner